**माहे सप्टेंबर २०२२ महाचा मासिक अहवाल :-**

**मासिक अहवालामध्ये खालील घटकांनी चांगली कामगिरी केलेली आहे.**


| अ क्र | घटकाचे नाव | श्वानाचे नाव / जात | हस्तकांची नावे | केलेली कामगिरीचा सारांश |
|---|---|---|---|---|
| १ | परभणी | पंच डॉबरमॅन मेल | १) पोहवा/३६७ एम. डी. बुधवारे<br>२) पोना/१३५० अशोक सरकटे | चुडावा पो.स्टे. गु.र.नं. १३८/२०२२ भा.द.वि. कलम ३०२ प्रमाणे हा गुन्हा दि.२१/९/२०२२ रोजी १९:०७ वाजता दाखल असून सदर गुन्हयातील घटनास्थळावर मयत महिलेच्या बाजुस आरोपीने हाताळलेल्या मातीच्या विटेचा वास गुन्हेशोधक श्वान पंच यास देवुन सोडले असता तो रोडने पब्लीक मधून वास घेत घेत एका घराचे खोलीमध्ये जावून एका इसमाच्या अंगावर जावुन भुंकल ाा सदर मुलगा नामे मारोती शंकरराव सोनटक्के रा .पिंपरण यास तपासी अंमलदारांनी ताब्यात घेवुन चौकशी केली असता त्याने गुन्हयाची कबुली दिली आहे. |



| अ क्र | घटकाचे नाव | श्वानाचे नाव / जात | हस्तकांची नावे | केलेली कामगिरीचा सारांश |
|---|---|---|---|---|
| २ | परभणी | पंच डॉबरमॅन मेल | १) पोहवा/३६७ एम. डी. बुधवारे<br>२) पोना/१३५० अशोक सरकटे | पुर्णा पो. स्टे. गु.र.नं. २२२/२०२२ भा.द.वि. कलम ३०२, २०१ प्रमाणे हा गुन्हा दि.२०/९/२०२२ रोजी २२:०५ वाजता दाखल असून सदर गुन्हयातील घटनास्थळावर मयत महिलेच्या बाजुस पडलेल्या निळे रंगाच्या चप्पलचा वास गुन्हेशोधक श्वान पंच यास देवुन सोडले असता तो रोडने मार्ग काढत पुर्णा रेल्वे प्लॅटफॉर्म नं ४ वर फिरून प्लॅटफॉर्म नं ४ वर जावुन परत येवुन नगरपालीका कार्यालयाकडे आला व तसाच मार्ग काढत मोकळया मैदानाने परत मयत महिलेजवळ गेला श्वान ज्या मार्गाने गेला त्या मार्गाचे सीसीटीव्ही फुटेज तपासी अंमलदार यांनी तपासले असता मयत महिलेसोबत एक अनोळखी इसम दिसून आला व पुढील तपासामध्ये सदर इसमास तपासी अंमलदारांनी ताब्यात घेवुन चौकशी केली असता त्याने गुन्हयाची कबुली दिली आहे. |



| अ क्र | घटकाचे नाव | श्वानाचे नाव / जात | हस्तकांची नावे | केलेली कामगिरीचा सारांश |
|---|---|---|---|---|
| ३ | नाशिक शहर | गुगल डॉबरमॅन मेल | १) पोकाँ/७८ कोडे<br><br>२) पोकाँ/६२५ चव्हाण | भद्रकाली पो. स्टे. गु.र.नं. २५९/२०२२ भा.द.वि. कलम ३८०, ४५४, ४५७ प्रमाणे हा गुन्हा दि.५/९/२०२२ रोजी ०१:३० वाजता दाखल असून सदर गुन्हयातील घटनास्थळावर मिळालेल्या संशयीत इसमाने हाताळलेल्या रूमाल व दागीन्यांच्या बॉक्सचा वास गुन्हेशोधक श्वान गुगल यास दिला असता श्वान घरात फीरून मुख्य दरवाजाने लोखंडी जीन्याने खाली उतरून घटनास्थळाचे डावे बाजूने मुख्य रस्त्यावर येवुन वास घेत नाशिक अमरधाम गोदावरीचे किनारे संशयी बसलेल्या ठिकाणी येवुन थांबला सदर इसमास तपासी अंमलदारांनी ताब्यात घेवुन चौकशी केली असता त्याने गुन्हयाची कबुली दिली आहे. |



अशा प्रकारे माहे सप्टेंबर २०२२ मध्ये श्वान पथकामार्फत खून - २, घरफोडी- १ असे एकुण - ३ गुन्हे उघडकीस आलेले आहेत.